| | | | |
|---|---|---|---|
| MHPU120004732018 | दाखल दिनांक | : | २७/०६/२०१८ |
| | नोंदणी दिनांक | : | २७/०६/२०१८ |
| | निकाल दिनांक | : | ०३/०८/२०२७ |
| | कालावधी | : | वर्षे महिने दिवस<br>०८ ०१ ०७ |

| | | |
|---|---|---|
| **भोर येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय, कनिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात**<br>**(पिठासीन अधिकारी श्रीमती. मिना वामन जाधव )** | | |
| **संक्षिप्त फौजदारी खटला क्र. २१९/२०१८. निशाणी क्र. ३८**<br>**गुन्हा नोंद क्र. ५५/२०१७ राजगड पोलिस ठाणे** | | |
| **अभियोगपक्ष** | :: | **महाराष्ट्र शासन तर्फे राजगड पोलीस स्टेशन,** |
| **अभियोगपक्षातर्फे प्रतिनिधीत्व** | :: | **सहा. सरकारी अभियोक्ता**<br>**श्री. वाय.पी. पोरे** |
| **आरोपी** | :: | **मोहन उर्फ चेतन बाळु सांबरे**<br>**वय– २६ वर्षे, धंदा – मजुरी**<br>**रा. साखरवाडी, पो. खामगांव, ता. फलटण, जि. सातारा.**<br>**मुळ रा. सांबरेवाडी, खानापुर, ता. हवेली, जि. पुणे** |
| **आरोपी तर्फे प्रतिनिधीत्व** | :: | **ॲड.श्री. आर. डी. खोपडे** |

**भाग – ब**

**(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद 44 (ii) अन्वये)**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०७/०४/२०१७ |
| फिर्याद दाखल तारीख | १४/०४/२०१७ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | २७/०६/२०१८ |
| दोषारोप निश्चित केल्याची तारीख | १५/११/२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०८/०९/२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखुन ठेवल्याची तारीख | ०३/०८/२०२६ |
| न्यायनिर्णय तारीख | ०३/०८/२०२६ |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भातील आदेशाची तारीख | निरंक. आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## आरोपीचा तपशील

| **आरोपी क्र.** | **आरोपीचे नाव** | **अटक दिनांक** | **जामीनावर सोडल्याचा दिनांक** | **गुन्हयाचे कलम** | **अंतिम आदेश** | **शिक्षा** | **फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **मोहन उर्फ चेतन बाळु सांबरे** | दि. २१/०४/२०१७ | दि. २१/०४/२०१७ | भा.द.वि. क. २७९, ३३८, ४२७ व ३०४ (अ) सह मो. वा. का. क. १८४, ३(१) १८१ अन्वये. | निर्दोष | निरंक | निरंक |

## भाग – क

## (फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद 44 (ii) अन्वये) अभियोगपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार / बचाव पक्षातर्फे साक्षीदार / न्यायालयीन साक्षीदार

**अ. अभियोग पक्ष –**

| **सा.क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **निशाणी क्रमांक** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|---|
| १. | विवेक लक्ष्मण साळुंके | १२ | साक्षीदार |
| २. | संजय नाना भोसले | १२ | साक्षीदार |
| ३. | सचिन भगवान काळे | १२ | तपासी अधिकारी |

**ब. बचाव पक्ष –**

| **अनु.क्र.** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | | |

**क. न्यायालयीन साक्षीदार –**

| **अनु.क्र.** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | | |

**अ.अभियोग पक्षामार्फत निशाणी –**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१. | ३१/पी.डब्ल्यु.३ | फिर्याद |
| ०२. | ३२/पी.डब्ल्यु.३ | छापील प्रथम खबर अहवाल |
| ०३. | ३३/पी.डब्ल्यु.३ | घटनास्थळ पंचनामा |
| ०४. | ३४/पी.डब्लयु.३ | वाहनांचे आर.टी.ओ. तपासणीकामी दिलेले पत्र |

**ब.बचाव पक्षामार्फत निशाणी –**

| अनु. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

**क.न्यायालया मार्फत निशाणी –**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

**ड. भौतिक वस्तु**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

## –:: न्या य नि र्ण य ::–

## (दिनांक ०३/०८/२०२६ रोजी पारीत)

आरोपी हा भारतीय दंड विधान कलम २७९, ३३८, ३०४ (अ), ४२७ सह मोटार वाहन कायदा कलम १८४, ३(१) १८१ अन्वये गुन्हयाचे संपरीक्षेस सामोरे जात आहे.

**०२.** अभियोगपक्षाने एकुण चार साक्षीदार तपासले आहेत. आरोपीने त्याच्या बचावाच्या पुष्ठ्यार्थ पुरावा सादर केलेला नाही. आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ३१३ नुसार जबाब नोंदवला असून त्यामध्ये त्याने त्याचेविरुध्द खोटी केस केली असल्याचा बचाव घेतला आहे. अभियोगपक्षातर्फे

विधिज्ञ श्री. वाय.पी. पोरे आणि आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. आर. डी. खोपडे यांचा युक्तीवाद ऐकला.

**०३.** आरोपीविरुध्द ठेवण्यात आलेला आरोप व अभियोगपक्षाने सादर केलेला पुरावा पाहता खालील प्रश्न माझ्या विचाराधीन येतात त्याचे कारणांसह निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **प्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१. | अभियोगपक्षाने शाबीत केले आहे काय की, दि. ०७/०४/२०१७ रोजी १६.०० वा. चे सुमारास मौजे शिंदेवाडी, ता. भोर, जि. पुणे गावचे हद्दीत गोगलवाडी फाटा येथे राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ वर पुणे सातारा लेनवर आरोपीने त्याचे ताब्यातील ओमनी कार क्रमांक एम एच ४२ के. १३२१ ही विनापरवाना पुणे बाजुकडुन सातारा बाजुकडे भरधाव वेगात हयगयीने अविचाराने, निष्काळजीपणे रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालवुन पुढे चाललेल्या टाटा इंडिका कार नं. एम.एच. ०४ सी.झेड ८०३७ हिस पाठीमागुन ठोस देवुन ओमनी कार पलटी होवुन घसरत जावुन रोडचे कडेला जावुन अपघात होवुन ओमनी कार मधील वैशाली संजय भोसले, रा. फलटण, जि. सातारा यांना गंभीर दुखापत होवुन त्यांचे मृत्युस व दोन्ही वाहनांचे नुकसानीस कारणीभुत होवुन भा.द.वि.क. २७९, ३३८, ३०४(अ), ४२७ सह मोटार वाहन कायदा कलम १८४, ३(१) १८१ प्रमाणे अपराध केला ? | ...नाही. |
| ०२. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## –:: कारण मीमांसा :–

**प्रश्न क्रमांक ०१ करीताः–**

**०४.** अभियोगपक्षामार्फत सदर गुन्हा शाबीत करणेकामी तीन साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली आहे. यथोचित संधी देवूनही अभियोग पक्षाने इतर साक्षीदारांना साक्षीकामी हजर न ठेवल्याने अभियोगपक्षाचा पुरावा दि. २१.०२.२०२६ रोजीच्या नि. क्र. ३६ वरील आदेशान्वये पुरावा बंद केला.

**०५.** फौजदारी न्यायशास्त्राप्रमाणे आरोपीवरील अपराध शंकेच्या पलीकडे जावून शाबीत करण्याची सर्वस्वी जबाबदारी अभियोगपक्षावर असुन अभिलेखावरील पुराव्यामध्ये एखादी शंका अथवा संशय निर्माण झाल्यास सदर संशयाचा फायदा फौजदारी न्यायशास्त्रानुसार आरोपीस दिला जातो.

**०६.** भारतीय पुरावा अधिनियमानुसार आरोपीवरील अपराधाचे शाबीतीसाठी अभियोगपक्षाला साक्षीदारांच्या संख्येची आवश्यकता नाही. अभियोगपक्ष केवळ एका साक्षीदाराच्या पुराव्यावरुन अपराध शाबीत करु शकतो. अभियोगपक्षास त्यानुसार अपराध शाबीत करण्यासाठी सादर केलेला साक्षीदाराचा पुरावा सक्षम व विश्वासार्थ असायला पाहिजे. जेणेकरुन त्यावर विसंबून राहून अपराध शाबीत होत आहे, याव्यतिरीक्त दुसरा निष्कर्ष काढता येणार नाही.

**०७.** अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले सा.क्र.०१ विवेक लक्ष्मण साळुंके यांनी त्यांच्या सरतपासात कथन केले की, घटना दि. ०७/०४/२०१७ रोजी सायंकाळी ०४.०० वाजताच्या दरम्यान कात्रज बोगदयापुढे दुस–या लेनमध्ये घडली. ६ तारखेला त्यांच्या मित्राने त्याला व अमित पवार याला फलटण येथे बोलावले होते. फलटण येथे गेल्यानंतर महेश पुजारी याने त्याला सांगितले की, श्वेता हेंद्रे हिच्याशी लग्न करायचे आहे, तुम्ही साक्षीदार म्हणुन येणार का ? त्यावेळी त्यास त्यांनी होकार दिला. त्यानंतर दुस–या दिवशी ते भाडयाने

गाडी घेवुन श्वेता हेंद्रे हिला आणण्यासाठी अहमदनगर येथे गेले. त्यावेळी त्यांच्यासोबत वैशाली भोसले नावाची महिला होती. त्यानंतर ते श्वेता हेंद्रे हिस घेवुन आळंदी, पुणे येथे गेले. उशिर झाल्यामुळे लग्न न लावता सदर साक्षीदार, अमित पवार व वैशाली भोसले असे घरी जाण्यासाठी निघाले. कात्रज येथील बोगदयाच्या पुढे दुस–या लेन मध्ये असताना गाडी अतिवेगामध्ये असल्याने चालकाचा ताबा सुटल्यामुळे सदर गाडी पुढच्या गाडीस धडकुन पलटी झाली. सदर वाहन घसरत जावुन दुभाजकावर जावुन अडकली. त्यानंतर तेथे जमलेल्या लोकांनी गाडी सरळ करुन त्यांना बाहेर काढले. त्यानंतर त्यांनी त्यांचा मित्र केशव सावंत यांस फोन करुन बोलावले. सदर अपघातामध्ये त्यांच्या उजव्या हातास खरचटले होते. तसेच वैशाली भोसले यांना डोक्याला व हातापायालया मार लागला होता. अमित यास खरचटुन पायाला मुक्कामार लागलेला होता. त्यानंतर केशव याने रुग्णवाहिका बोलावुन वैशाली यांना पल्स हॉस्पीटल पुणे येथे नेले. त्यानंतर वैशाली भोसले यांच्या आत्याचा मुलगा तेथे आल्यानंतर ते केशव सावंत यांच्या घरी गेले. त्यानंतर दुस–या दिवशी ते त्यांच्या घरी गेले. अपघातासंदर्भाने पोलिसांनी त्यांचे तपास टिपण नोंदवले. ओमनी चालकाचे नाव त्यांना त्यांचा मित्र महेश पुजारी यांच्याकडुन समजले.

०८. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. २ संजय नाना भोसले यांनी कथन केले की, घटना दि. ०७/०३/२०१७ रोजी शिंदेवाडी येथील जकात नाका येथे घडली. सदर दिवशी त्यांना त्यांच्या वडीलांचा सायंकाळी ६ वाजण्याच्या दरम्यान फोन आला की, त्यांच्या पत्नीचा अपघात झाला आहे, ती हॉस्पीटलमध्ये अॅडमिट आहे. त्यानंतर सदर साक्षीदाराने त्याचा मेव्हणा राकेश सोपान शितोळे यांना फोन करुन पल्स हॉस्पीटल येथे जावुन एक लाख रुपये भरण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी र.रु. १ लाख भरले. त्यानंतर रुग्णास ससुन हॉस्पीटल येथे नेले. त्यानंतर पाच ते सहा दिवसांनी त्यांची पत्नी मृत्यु पावली. घटनेसंदर्भाने

पोलिसांनी त्यांचे तपासटिपण नोंदवले होते. त्यानंतर पोलिसांनी त्यांना सांगितले की, ओमनी गाडीमध्ये पवार, साळुंखे आणि चालक सांबरे होते.

**०९.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ सचिन भगवान काळे यांनी कथन केले की, ते सन २०१७ मध्ये राजगड पोलिस ठाणे येथे कार्यरत होते. दि. १४/०४/२०१७ रोजी गु.र.क्र. ५५/२०१७ भा.दं.वि.कलम २७९,३३७,३३८ सह मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे गुन्हा दाखल होवुन सदर गुन्हयाचा तपास तोंडी आदेशान्वये त्यांच्याकडे देण्यात आला. तपासाकामी त्यांच्याकडे फिर्याद व छापील प्रथम खबर देण्यात आली. सदर फिर्याद गणेश दत्तात्रय खेडकर यांनी दिली. फिर्यादी हे त्यांची टाटा इंडिका कार क्रमांक एम.एच. ०४ सी.झेड. ८०३७ ही घेवुन सातारा बाजुने जात असताना मागुन मारुती सुझुकी ओमनी कार क्र. एम.एच. ४२ के. १३२१ हिने मागुन धडक देवुन घसरत बाजुला गेली अशा आशयाचा फिर्याद दिली. सदर फिर्याद ठाणे अंमलदार तलबार यांनी नोंदवुन घेतली. सदरची फिर्याद निशाणी क्र. ३१ व छापील प्रथम खबर अहवाल निशाणी क्र. ३२ वर आहे.

**१०.** तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळ पंचनामा दोन पंचासमक्ष निशाणी क्र. ३३ केला. त्यानंतर त्यांनी साक्षीदारांची तपासटिपणे त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदवली. सदर अपघातामध्ये वैशाली संजय भोसले हया खमी होवुन ससुण हॉस्पीटल येथे अॅडमीट असताना मयत झाल्या. त्यानंतर अपघातग्रस्त गाडयांचे आर.टी.ओ. मार्फत् तपासणी होण्याकामी त्यांनी निशाणी क्र. ३४ वर पत्र दिले. त्यानंतर वाहनांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

**११.** सदर साक्षीदारांचा बचाव पक्षातर्फे सविस्तर उलटतपास घेण्यात आला. उलटतपासादरम्यान साक्षीदार विवेक याने कथन केले की, दि.

०७/०४/२०१७ ते २७/०४/२०१७ रोजी पर्यंत त्याने कोठेही तक्रार दाखल केली नाही. तसेच सदर गाडी शहरामध्ये आल्यानंतर देखिल वेगात असल्याचे परंतु आरोपीने कुठलेही सिग्नल तोडलेले नव्हते. तसेच त्याने मान्य केले की, कात्रज येथे एक नविन आणि दुसरा जुना असे दोन ब्रिज असुन दोन्ही बोगदयातुन आलेली वाहने दोन क्रमांकाच्या ब्रिजवर एकत्र येतात. त्यामुळे तेथे वाहनांची गर्दी होते. दोन्ही बोगदयातुन वाहने एकत्र आल्यामुळे अचानक थांबली जातात. त्याने पुढे कथन केले की, पुढची वाहने अचानक थांबलयामुळे त्याचे वाहन समोरील वाहनास जावुन धडकले, त्यामुळे सदरचा अपघात झाला. तसेच त्याने स्पष्टपणे मान्य केले की, सदर अपघातामध्ये त्यांच्या ओमनी वाहन चालकाची काहीएक चुक नव्हती.

**१२.** साक्षीदार संजय हा मयत वैशाली यांचा पती असुन त्याने उलटतपासादरम्यान अपघात कोणाच्या चुकीमुळे झाला याची त्याला वैयक्तिक माहिती नसल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे सदर साक्षीदारांचा पुरावा घटनेच्या अनुषंगाने पुरेसा नाही असे मला वाटते.

**१३.** साक्षीदार काळे हे तपास अधिकारी असुन त्यांनी उलटतपासादरम्यान कथन केले की, त्यांनी फिर्यादी अथवा आरोपीस मोटार वाहन कायदा कलम २०९ प्रमाणे नोटिस दिली नाही. तसेच घटनास्थळाच्या आजुबाजुच्या लोकांनी तटस्थ साक्षीदार म्हणुन तपास टिपणे नोंदविली नाहीत. सदर साक्षीदाराच्या पुराव्यात त्याने तपासाबाबत मोघम स्वरुपाचा पुरावा दिल्याचे स्पष्ट होते.

**१४.** याव्यतिरीक्त अभियोगपक्षाने इतर कोणत्याही महत्वपुर्ण साक्षीदारांचा पुरावा न्यायालयासमक्ष दिलेला नाही. किंबहुना फिर्यादी गणेश दत्तात्रय खेडेकर याचा पुरावा न्यायालयासमक्ष न आल्यामुळे फिर्याद निशाणी क्र. ३१ ही

संशयापलिकडे सिध्द झालेली नाही. किंबहुना सदर फिर्याद देण्यास सात ते आठ दिवसाचा विलंब झाल्यासंदर्भाने कोणतेही कारण फिर्याद मध्ये नमुद नाही.

**१५.** वर नमुद साक्षीदारांच्या मौखिक पुराव्याचे अवलोकन करता अपघातावेळी आरोपी भरधाव वेगात आणि निष्काळजीपणे त्याच्या ताब्यातील वाहन चालवित होता असा स्पष्ट पुरावा न्यायालयासमक्ष आलेला नाही.

**१६.** बचावपक्षाने पुराव्यादरम्यान मरणोत्तर पंचनामा निशाणी क्र. ३५ मान्य केला आहे. तसेच वैशाली संजय भोसले यांचा अपघातामध्ये मृत्यु झाला ही बाब आरोपीच्या वकीलांनी कोठेही नाकारलेली नाही. साक्षीदारांचा मौखिक पुरावा तसेच मरणोत्तर पंचनामा निशाणी क्र. ३५ या सर्व पुराव्यावरुन हे स्पष्ट होते की, वैशाली संजय भोसले यांचा मृत्यु झाला. परंतु, कथित अपघातावेळी सदर वाहन आरोपी भरधाव वेगात आणि निष्काळजीपणे चालवित होता ही बाब सबळ पुराव्याअभावी सिध्द न झाल्यामुळे आरोपीस वैशाली यांच्या मृत्युस कारणीभुत धरता येणार नाही.

**१७.** वर नमुद चर्चेनंतर असे दिसते की, कथित अपघाताच्यावेळी आरोपी सदर वाहन भरधाव वेगात चालवित होता हे स्पष्टपणे सिध्द झालेले नाही. अशा परिस्थितीत आरोपीला वैशाली भोसले यांच्या मृत्युस कारणीभुत ठरविणे योग्य होणार नाही. म्हणुन मी निष्कर्ष नोंदविते की, आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगात हयगयीने, निष्काळजीपणे, रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालवुन पुढे चालत्या टाटा इंडिका कार हीस पाठीमागुन ठोस देवुन ओमनी कार पलटी करुन वैशाली भोसले यांना गंभीर दुखापत होवुन त्यांच्या मृत्युस कारणीभुत होवुन दोन्ही गाडयांच्या नुकसानीस कारणीभुत झाला हे सबळ पुराव्याअभावी सिध्द होत नाही. सबब, मी प्रश्न क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.

**प्रश्न क्रमांक ०२ करीताः–**

**१८.** प्रश्न क्र. १ चे उत्तर नकारार्थी दिल्याने आरोपी निर्दोषमुक्त होण्यास पात्र आहे. त्यामुळे प्रश्न क्र. २ च्या उत्तरादाखल मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

:: **आ दे श** ::

०१. आरोपी मोहन उर्फ चेतन बाळु सांबरे हयाची फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५(अ) अन्वये भारतीय दंड विधान कलम २७९, ३३८, ३०४(अ), ४२७ सह मोटार वाहन कायदा कलम १८४, ३(१) १८१ नुसार गुन्हा केल्याच्या आरोपातुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

०२. आरोपीने यापुर्वी दिलेला जामीन कदबा रद्द करुन त्यास खुले करण्यात येते.

०३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७(अ) अन्वये रुपये पन्नास हजार इतक्या रकमेचे नविन बंधपत्रे व जामिनपत्रे दाखल करावेत.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात लिहणेत व घोषित करण्यात आला.)

JADHAV MEENA WAMAN
Digitally signed by JADHAV MEENA WAMAN
Date: 2026.08.03 17:31:58 +0530

**ठिकाण : भोर** **( मीना वा. जाधव )**

**दिनांक : ०३.०८.२०२६** **न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, भोर**

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अशी खात्री देतो की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मजकुर मुळ आदेशाप्रमाणे प्रत्येक शब्द बरोबर आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | एम.डी. शिरोडे, नि.श्रे. |
| न्यायालयाचे नाव | – | मे. श्रीमती एम.व्ही. जाधव, प्र.वर्ग. न्या.दं. भोर |
| निकाल तारीख | – | ०३.०८.२०२६ |
| पिठासीन अधिकारी यांनी सही केल्याची तारीख | – | ०३.०८.२०२६ |
| अपलोड केल्याची तारीख | – | ०३.०८.२०२६ |